दुरध्वनी क्र.02562-279434/35
E mail:-cmdt.srpf6.dhule@mahapolice.gov.in
srpfgrvi@gmail.com

महाराष्ट्र शासन
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.20 वरणगाव यांचे कार्यालय सद्या कॅप धुळे,
महिंदळे शिवार, साक्री रोड, सुरत बायपास हायवे, धुळे 424001.

पुण्यश्लोक 300

जा.क्र.समा./रारापोबल/गट-20/स.पो.शि.भरती-2024-25/नियुक्ती आदेश-4/1066/2026 दि.:-30/09/2026

**आ दे श :-**

राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. 20, वरणगाव, ता.भुसावळ, जि.जळगाव आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई भरती- 2024-25 मध्ये गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या निवडयादीतील उमेदवारांना सशस्त्र पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्याचे अनुषंगाने त्यांची वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी करण्यात आलेली असुन त्यात खालील उमेदवार पात्र ठरले आहेत. उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर केलेल्या शैक्षणिक पात्रता, जन्म दिनांक दर्शविणारा दाखला, जातीचा दाखला व इतर आवश्यक दाखल्यांनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जात प्रवर्गात खालील नमुद अटी व शर्तीचे अधिन राहुन राज्य राखीव पोलीस बल गट क्र. 20, वरणगाव, ता.भुसावळ, जि.जळगाव आस्थापनेवर **सशस्त्र पोलीस शिपाई** या पदावर वेतनश्रेणी रु.21700-69100 (वेतनस्तर S-7) अधिक रुपये 750/- विशेष वेतन यामध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात हजर झाल्याच्या दिनांकापासुन नियुक्ती करण्यात येत आहे. **नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांनी दिनांक 01-10-2026 रोजी सकाळी 07.00 वाजता राज्य राखीव पोलीस बल गट क्र.20, वरणगाव (राज्य राखीव पोलीस बल गट क्र.6, धुळे) या ठिकाणी न चुकता हजर रहावे.** सदर उमेदवारांनी कर्तव्यावर हजर होतांना नियुक्ती आदेशातील अटी मान्य असल्याबाबतचे संमतीपत्र / बंधपत्र / हमीपत्र लिहुन देणे बंधनकारक राहील.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | चेस्ट क्रमांक | जातीचा प्रवर्ग | निवड प्रवर्ग | संपुर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| 1 | आकाश श्रीकृष्ण बेले | 19400 | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती/ सर्वसाधारण | रा. मु.कारपा. पो.गिरोली, ता.मानोरा, जि.वाशिम |
| 2 | पंकज लक्ष्मण आघाव | 7241 | भज-ड | भज-ड/ सर्वसाधारण | रा. मु.पो.मांडवा, ता.रिसोड, जि.वाशिम. |
| 3 | वैभव हरी घोडके | 6491 | इमाव | इमाव/ सर्वसाधारण | रा. एल224, घर नं. ए.एस. क्लब रोड, गणपती मंदीर, परीजातक नगर, तिसगाव, छत्रपती संभाजीनगर |
| 4 | ज्ञानेश्वर विठ्ठल जाधव | 23817 | एसईबीसी | एसईबीसी/ भुकंपग्रसत | रा. मु.पो.सलतेवाडी (बिबी), ता.पाटण, जि.सातारा |
| 5 | ललित दिगंबर ठोके | 16083 | आदुघ | आदुघ/ सर्वसाधारण | रा. मु.पो.मळगाव (ति), ता.बागलाण, जि.नाशिक |

**नियुक्तीसाठीच्या अटी व शर्ती**

1) नवप्रविष्ठ सशस्त्र पोलीस शिपाई या पदावर देण्यात आलेली नियुक्ती निव्वळ " तात्पुरत्या स्वरुपात " असुन तात्पुरत्या स्वरुपात असलेल्या पदांची मुदत संपल्याबरोबर किंवा सदरचे पद संपुष्टात आल्यानंतर देण्यात आलेली तात्पुरत्या स्वरुपाची नियुक्ती उमेदवारास कोणत्याही प्रकारची पुर्व लेखी सुचना न देता संपुष्टात येईल. तसेच सदर नियुक्तीमुळे उमेदवारास भविष्यात शासकीय सशस्त्र पोलीस शिपाई पदावर हक्क प्रस्थापित करता येणार नाही.

2) उमेदवारास कर्तव्यार्थ रुजु होते वेळी भारतीय घटनेतील भारतीय संघराज्याशी एकनिष्ठ राहणेबाबत लेखी शपथ घ्यावी लागेल.

3) उमेदवारास नेमणुकीच्या पदावर राज्य राखीव पोलीस बल गट क्र.20 वरणगाव (सद्या कॅम्प धुळे) मुख्यालयी नोकरीवर रुजू होण्यासाठी येण्याचा प्रवासभत्ता किंवा प्रवासभाडे अनुज्ञेय नाही.

4) उमेदवाराची नियुक्ती उमेदवाराने साक्षांकन नमुन्यात नमुद केलेली माहिती, चारित्र्य पडताळणी, जातीचे मुळ प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखल्यातील जन्मदिनांक, तसेच शैक्षणिक व तद्अनुषंगिक दस्तऐवजांच्या

Scanned with CamScanner

पडताळणीचे अधिन राहुन करण्यात येत आहे. संबंधीत खात्याकडुन कोणत्याही टप्प्यावर पडताळणी आक्षेपार्ह किंवा प्रतिकुल अहवाल प्राप्त झाल्यास किंवा उमेदवारांनी सादर केलेले इतर सर्व संबंधीत कागदपत्र / प्रमाणपत्र भविष्यात खोटे किंवा असत्य किंवा संशयास्पद असल्याचे निष्पन्न झाल्यास तसेच साक्षांकन नमुना फॉर्ममध्ये खोटी माहिती भरून शासनाची दिशाभूल केल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवारास कोणत्याही प्रकारची लेखी कारणमिमांसा न कळविता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल / सेवेतून कमी करण्यात येईल.

5) उमेदवारांस महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम 2012, महाराष्ट्र पोलीस नियमावली 1959, राज्य राखीव पोलीस बल अधिनियम 1951, राज्य राखीव पोलीस बल नियम 1959, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम 1956 व राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागू राहतील.

6) महाराष्ट्र शासन, गृहविभाग यांचेकडील पत्र क्र.पीएसबी-0311/प्र.क्र.521/पोल-5अ, दि.26-09-2011 व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. प्रशि/पोशि भरती/प्रशि. खर्च वसुली/2012/2231, दि.26-04-2012 अन्वये सशस्त्र पोलीस शिपाई पदावरील निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात सशस्त्र पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवाराकडून प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्त्यासहीत वसुल करण्यात येईल, अशा प्रकारचे बंधपत्र (बॉण्ड/हमीपत्र) लिहुन देणे आवश्यक राहील.

7) पोलीस प्रशिक्षण विद्यालयात नियमित व मुलभूत प्रशिक्षण खंड न पडता कोणत्याही प्रकारचे गैरशिस्त वर्तन न करता / आक्षेपार्ह वर्तन न करता यशस्वीरित्या विहित संधी व मुदतीत पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रशिक्षणादरम्यान आक्षेपार्ह किंवा गैरशिस्त वर्तन / वर्तणूक निदर्शनास आल्यास उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच तीन वर्षाचा सेवा कालावधी पुर्ण होईपर्यंत मध्यांतरीच्या कालावधीत उमेदवाराची शिस्त, वर्तणुक व कामगिरी असमाधानकारक आढळल्यास अशा उमेदवारांची सशस्त्र पोलीस शिपाई पदावरील सेवा कोणतेही कारण न दाखविता समाप्त करण्यात येईल. तसेच सदर नेमणुकीमुळे उमेदवारास भविष्यात शासकीय नेमणुकीसाठी सशस्त्र पोलीस शिपाई या पदावर हक्क प्रस्थापित करता येणार नाही, यांची संबंधीतांनी स्पष्ट नोंद घ्यावी. तसेच वरील बाबी समाधानकारक आढळुन आल्यास उमेदवार कायमपणाचे फायद्याचे प्रमाणपत्र देण्यास पात्र ठरतील.

8) राज्य राखीव पोलीस बल हे निमलष्करी बल असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना वारंवार कोणत्याही वेळी गट मुख्यालय सोडुन महाराष्ट्र राज्यात कोठेही (गडचिरोली, गोंदीया, चंद्रपुर व इतर जिल्हयात) तसेच महाराष्ट्राबाहेर अंतर्गत सुरक्षा बंदोबस्ताकरीता कंपनी सोबत जाणे बंधनकारक राहील. त्याअनुषंगाने उमेदवारास राज्याच्या राखीव पोलीस फौजेत ज्या कोणत्याही ठिकाणी माझी नेमणूक करण्यात येईल त्या ठिकाणी मी नोकरी करण्यास राजी राहील, अशा आशयाचा करारनामा कर्तव्यार्थ रुजू होते वेळी लिहून दयावा लागेल.

9) उमेदवारास 2 मुले पेक्षा जास्त मुले नाहीत, याबाबतचा महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-2005 मधील प्रतिज्ञापनाचा नमुना-अ भरून दयावा लागेल.

10) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: अंनियो-2015/(NPS)/प्र.क्र.-32/सेवा-4, दिनांक 06-04-2015 ला अनुसरुन नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागु होईल. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:रानियो-2022/ प्र.क्र.34/ सेवा-4, दिनांक 31.03.2023 व वेळोवेळीच्या सुधारणांनुसार योग्य ते विकल्प देणे आवश्यक आहे.

11) दिनांक 01 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागु राहील. मात्र सध्या अस्तीत्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन), नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तीत्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.

12) उमेदवारांची सेवाजेष्ठता तसेच अंतरिक सेवाजेष्ठता (Interse seniotity) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील स्थायी आदेश क्र.22/2013 क्रमांक पोमसं/6/10/पो.शि.भरती-सेवाज्येष्ठता/251/2012, दिनांक 17-8-2013 नुसार लावण्यात येईल.

Scanned with CamScanner

13) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दिनांक 12-12-2011 नुसार मागास प्रवर्गासाठी आरक्षित पदावर निवड झालेल्या उमेदवारास त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तातपुरती नियुक्ती देण्यात येत असून अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. असा उमेदवार नियुक्ती आदेश प्राप्त झाल्या दिनांकापासून 6 महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकल्यास त्याची नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल. तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने संबंधीताचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येवून, अशा उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनीयमन) अधिनियम, 2000 यातील तरतूदीनुसार व भारतीय दंड विधान, 1860 मधील विविध तरतुदीनूसार कारवाई करण्यात येईल. सदरचे नियुक्ती आदेश हे याचिका क्र.2136/2011 व अन्य यांचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.25-08-2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल करण्यात आलेल्या स्पेशल लिव पिटीशन चे आदेशाच्या अधिन राहून आहेत.

14) महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि.,शासन पत्र क्रमांक संकिर्ण-2024/प्र.क्र. 79/आरक्षण-5, दिनांक 19.04.2024 अन्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्या मागास वर्गाकरिता अधिनियम, 2024 या अधिनियमाबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचीका क्र.3468/2024 व इतर दाखल याचिकांमधील आदेशांच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

15) उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे पोलीस दलासाठी मानसिक दृष्टया योग्य असल्याबाबतची वैद्यकीय चाचणी घेण्यात येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र आढळल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल नोकरीसाठी त्या पदावर पुन्हा कोणताही न्यायीक हक्क राहणार नाही.

16) उमेदवारास शासनाने वेळोवेळी केलेल्या तांत्रिक अर्हता प्राप्त करणे / पूर्ण करणे बंधनकारक राहील.

17) उमेदवारास प्रशिक्षण कालावधीत वेतन व इतर भत्ते देय असतील. घरभाडे भत्ता देय राहणार नाही.

18) यापुर्वी केंद्र / राज्य शासनाचे सेवेत असलेल्या उमेदवारांनी सदरची नियुक्ती स्विकारण्यापुर्वी पुर्वीचे सेवेचे कार्यमुक्त आदेश किंवा तत्सम प्राधिका-याचे राजीनामा स्विकृतीपत्र सादर करणे क्रमप्राप्त राहील.

19) ज्या उमेदवारांनी नियुक्तीपुर्वी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण केलेली नाही, अशा उमेदवारांना महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण/2020/प्र.क्र.06/2001/39, दि.19-03-2003 मधील तरतीनुसार नियुक्तीचे दिनांकापासुन 02 वर्षाचे आंत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

उमेदवाराने कर्तव्यार्थ रूजू होतांना नियुक्तीचा मुळ आदेश, सर्व शैक्षणिक मुळ कागदपत्रे जसे शैक्षणिक गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणी कार्ड, उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे प्रमाणपत्र, समांतर आरक्षणांतर्गत मोडत असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र इत्यादी सर्व मुळ कागदपत्रांचा व एक छायांकित, प्रमाणीत केलेला प्रतींचा संच, पासपोर्ट साईजचे पाच (05) रंगीत फोटो सोबत आणावेत व फोटोच्या पाठीमागे पुर्ण नांव, पत्ता स्वहस्ताक्षरात नोंदवावा.

कर्तव्यार्थ रुजू होतांना सर्व शैक्षणिक मुळ कागदपत्रे न आणल्यास किंवा अपूर्ण असल्यास कर्तव्यावर हजर करुन घेतले जाणार नाही यांची नोंद घ्यावी. उमेदवाराने नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदाचे मुलभूत प्रशिक्षणासाठी पोलीस प्रशिक्षण केंद्रात जाण्याच्या तयारीनिशी दिलेल्या मुदतीत कर्तव्यार्थ रुजू व्हावे.

उमेदवारास राज्य राखीव पोलीस बल गट क्र.20, वरणगाव, ता.भुसावळ, जि.जळगाव येथे वेळोवेळी आयोजित केलेले प्रशिक्षण सत्रे पूर्ण करावी लागतील. उमेदवार कर्तव्यार्थ गट मुख्यालयात हजर झाल्यानंतर त्यांना त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पुर्व परवानगीशिवाय गट मुख्यालय सोडून बाहेर इतर ठिकाणी जाता येणार नाही. कर्तव्यार्थ हजर होण्याकामी येताना सोबत त्यांना आवश्यक असलेले बेडींग, दैंनदिन लागणाऱ्या वस्तू, गट मुख्यालयात जेवण्याच्या सोईसाठी मेस अॅडव्हान्स म्हणून रु.10,000/- प्रत्येकी आणावेत.

Scanned with CamScanner

उमेदवार दिलेल्या तारखेस सशस्त्र पोलीस शिपाई पदावर हजर न झाल्यास ते या पदावर नियुक्त होऊ इच्छीत नाही असे गृहीत धरुन नियुक्तीचे आदेश रद्द करण्यात येतील. नंतर कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी व्यक्तीश: नोंद घ्यावी.

30/01/26

( प्रभाकर म. शिंदे )
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. 20 वरणगाव

**प्रति,**

वर नमुद संबंधीत उमेदवार

**प्रत :-** स्थानिक कंपनी नायक, रा.रा.पो.बल गट क्र. 6, धुळे

2/- यांनी वर नमुद उमेदवार ज्या तारखेस कर्तव्यार्थ रुजू होतील त्यावेळी आदेशात दिलेल्या सुचनेनुसार मुळ कागदपत्र जमा करुन घ्यावेत व त्यांचेकडून सदर आदेशात नमूद केलेले भरुन घ्यावयाचे सर्व फॉर्मस् व हमीपत्र इत्यादी लगोलग भरुन घ्यावेत.

**प्रत :-** वेतन देयक लिपिक / पोलीस लेखापाल / उप लेखापाल / पत्रव्यवहार शाखा / जमादार ॲडज्युटंट / पो.नि. गटभांडार / पोनि.कल्याण / गराप लिपीक, रा.रा.पो.बल गट क्र. 20, वरणगाव.

प्रत:- समादेशक सहाय्यक, रा.रा.पो.बल गट क्र.20, वरणगाव.

**<u>प्रत सविनय सादर</u>:-**

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर / पुणे.

Scanned with CamScanner